# आरोग्य विभागाच्या गट क व गट ड भरती संदर्भाने महत्वाची सूचना

आरोग्य विभागातील गट क मधील १४ नेमणूक अधिकारी यांचे अंतर्गतच्या ५२ संवर्गांच्या भरतीची प्रक्रिया सुरु आहे. दि. २४.१०.२०२१ रोजी घेतलेल्या गट क परीक्षेच्या सर्व संवर्गाच्या तात्पुरत्या उत्तर तालिका प्रसिद्ध करण्यात आल्या असून या संदर्भात परीक्षार्थींनी केलेल्या सूचनांची छाननी करण्यात येत आहे. तसेच ज्या मुलांना चुकीची प्रश्न पत्रिका देण्यात आली असे १० संवर्ग आहेत, त्यांची पुन्हा परीक्षा घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

ज्या १० संवर्गामधील उमेदवारांच्या फेर परीक्षा घेण्यात येणार आहेत ते संवर्ग / मंडळ सोडून इतर संवर्गाचे / मंडळांचे निकाल जश्या उत्तर तालिका अंतिम होतील त्यानुसार प्रसिद्ध करण्यात येतील. उर्वरित संवार्गांचे / मंडळाचे बाबत चुकीच्या प्रश्नपत्रिका मिळालेल्या उमेदवारांची फेर परीक्षा झाल्यानंतर निकाल प्रसिद्ध करण्यात येतील.

राज्य स्तरीय संवर्गाचे बाबत (उदा. सहसंचालक कुष्ठरोग अंतर्गत अवैद्यकीय सहायक संवर्ग) या पदांचा निकाल फेर परीक्षा झाल्यानंतरच  प्रसिद्ध करण्यात येईल. मंडळ स्तरावरील संवार्गांचे बाबत (उदा. दूरध्वनी चालक) हा संवर्ग मंडळ स्तरीय असल्यामुळे अश्या पदांसाठी ज्या मंडळामध्ये चुकीची प्रश्न पत्रिका देण्याची घटना घडली ती मंडळे सोडून इतर मंडळाचे अंतिम निकाल जाहीर करण्यात येतील व समुपदेशन प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

फेर परीक्षा घेण्यात यावयाचे नेमणूक अधिकारी नुसार संवर्ग आणि फेर परीक्षेची तारीख पुढील आठवड्यात जाहीर करण्यात येईल व तसे संबंधित उमेदवारांना कळविण्यात येईल.

गट ड संवर्ग परीक्षेबाबत पुढील कार्यवाही स्थगित ठेवण्यात आली आहे. पोलीस विभागाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवालातील माहितीनुसार गट ड संवर्ग भरतीबाबत पुढील निर्णय घेण्यात येईल.